सं. फौ. ख. क्र. २१६/२०२४
निशाणी १ सोबत

**फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०० प्रमाणे फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. १ चा जबाब**

मी शपथेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **माझे नांव** | **:** | **राजश्री संतोष कदम** |
| वय | : | वर्षे ३६ |
| धंदा | : | शेती |
| पत्ता | : | रा.हिगंणगाव (बु), ता. कडेगांव, जि. सांगली. |

२७/०४/२०२३ रोजी दुपारी ०३.३० वाजता आरोपी ट्रॅक्टर घेवुन माझ्याघरासमोरून जात होते. त्यावेळी त्यांना 'रस्ता नसताना ट्रॅक्टर कशाला घेवुन जात आहात' असे मी बोलले असता त्यांनी शिवीगाळ केली. त्यावेळी सिताराम नामदेव कदम, रंजना सिताराम कदम, शरद व उज्वला असे होते. त्यानंतर त्यांनी मारहाण करायला सुरवात केली. त्यावेळी माझी मुलगी व ट्रॅक्टर चालक शैलेश यांनी सदरची भांडणे सोडवली. त्यानंतर 'रस्ता इथुन जाणार आम्ही पोलीस स्टेशनला भीत नाही, तुला काय करायचे ते कर' असे ते बोलले. त्यानंतर मी आणि माझी मुलगी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करायला गेलो. त्यानंतर माझी वैद्यकीय तपासणी केली. सदरची पावती पोलीस ठाण्यात दिली. त्यानंतर आरोपी यांच्याविरूद्ध एन. सी. गुन्हा दाखल केला.

२. त्यानंतर मी सांगली येथील जिल्हा पोलीस प्रमुख यांना पत्राने कळवले. त्यानंतरही पोलीसांनी मला चौकशीकरिता बोलावले नाही. त्यानंतर आरोपी 'आम्ही कोणाला भीत नाही', असे बोलु लागले. माझे घर मळ्यामध्ये गावापासुन २-३ कि.मी. अंतरावरती आहे. माझे पती कामानिमित्त बाहेरगावी असतात. मी आणि माझी मुलगी घरी असतो. त्यामुळे आमच्या जीवाला आरोपी यांच्यापासुन धोका आहे.

20-3-25

राजश्री संतोष कदम

साक्षीदाराची सही

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत**
**सदरचा जबाब माझे समक्ष नोंदवला.**

20.3.25

कडेगांव.
दिनांकः २०/०३/२०२५

**( सी. आर. पाटील)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग**
**(न्यायालय क्र. ३)**

**<u>प्रमाणपत्र</u>**

सदरचा जबाब साक्षीदाराचे सांगण्याप्रमाणे संगणकावर माझे समक्ष टंकलिखीत केला असून तो साक्षीदाराचे सांगण्याप्रमाणे खरा व बरोबर आहे.

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत**
**सदरचा जबाब माझे समक्ष नोंदवला.**

20.3.25

कडेगांव.
दिनांकः २०/०३/२०२५

**( सी. आर. पाटील)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग**
**(न्यायालय क्र. ३)**